# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
क्र.वि.नि.वि.वि/२०१९–२०/३
११ जुन, २०१९

<u>परिपत्रक</u>:

विद्यापीठाच्या विविध विभागांचे/संस्थाचे विभागप्रमुख/संचालक यांना असे कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषद दिनांक २९ जानेवारी, २०१९ च्या बैठकीमध्ये बाब क्र. ५ अन्वये खालील प्रमाणे माहिती देण्यात यावी, असे ठरले.

**''विद्यापीठात सामंजस्य कराराद्वारे किती अभ्यासक्रम चालतात, अभ्यासक्रमांचे शुल्क किती आहे? सदर शुल्क कोणत्या निकषाने ठरविले याची माहिती देण्यात यावी.''**

तरी आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या विभागाद्वारे करण्यात येणा–या सामंजस्य कराराबाबत खालील नमुन्यामध्ये संपूर्ण माहिती त्वरीत उलट टपाली आठ दिवसात दिनांक १९ जुन, २०१९ पर्यंत विभागात पाठविण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. | विभागाचे नाव | |
| २. | सामंजस्य करारांची संख्या | |
| ३. | सामंजस्य करारातील संस्था | |
| ४. | सामंजस्य कराराचा कालावधी | |
| ५. | सामंजस्य करारानुसार चालणारे अभ्यासक्रम | |
| ६. | अभ्यासक्रम सुरू होण्याचे शैक्षणिक वर्ष | |
| ७. | अभ्यासक्रमाचे शुल्क | |
| ८. | सामंजस्य कराराची प्रत | |
| ९. | शुल्क ठरविण्याचे निकष | |

ज्या विभागातर्फे सामंजस्य करार करण्यात आलेले नाहीत त्यांनी ''लागू नाही'' असा शेरा देऊन विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागात कळवावे.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२
११ जुन, २०१९

प्रत रवाना –
विद्यापीठाचे सर्व विभागाचे/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.